Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित/ परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविम.वि.मं/१२वी गोप.नियुक्ती/4153
दिनांक:- २५/११/२०२५
26 NOV 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
जि.सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) फेब्रु.-मार्च २०२६ करीता परीक्षक/नियामक नियुक्ती पत्र व त्यासंबंधित सुचनांबाबत...**
**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/उमा.गोप/उ.प.तपासणी/३२५० दिनांक १५/०९/२०२५**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त पॅनलनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु.-मार्च २०२६ करीता उत्तरपत्रिकांचे परीक्षण/नियमन करण्यासाठी आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यरत शिक्षकांचे परीक्षक/नियामक नियुक्ती पत्र सोबत पाठविण्यात येत आहे. सदर नियुक्तीपत्र संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून सदरची माहितीची पुनश्चः पडताळणी करावी व नियुक्तीपत्रावर संबंधित परीक्षक/नियामक यांची स्वाक्षरी घेवून सदरचे मूळ नियुक्तीपत्र **दिनांक १२ /१२/२०२५** पर्यंत अथवा तत्पूर्वी या कार्यालयास पोस्टाव्दारे/खास दुताकरवी हस्तपोच प्राप्त होईल याप्रमाणे तात्काळ विनाविलंब पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर नियुक्ती पत्रानुसार शिक्षकांच्या माहितीमध्ये काही चुका राहणार नाहीत याकरीता उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी. सदर नियुक्ती पत्रावरील माहितीमध्ये काही दुरुस्ती असल्यास ती लाल शाईने दर्शवावी. खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शिकविले जाणारे सर्व विषय पॅनलमध्ये असल्याबाबत खात्री करावी. तसेच शिक्षकांच्या नावासमोर दर्शविलेले विषय, माध्यम, नाव व मोबाईल नंबर बरोबर असल्याची खातरजमा करण्यात यावी.

२. एखादा शिक्षक दोन अथवा दोनपेक्षा अधिक विषय शिकवित असेल तर कोणत्या विषयांस प्रथम प्राधान्य असेल ते प्रकर्षाने नमूद करावे. जेणेकरुन एकाच शिक्षकास दोन विषयाचे पेपर तपासणीस जाणार नाहीत. तथापि विषयांचा प्राधान्यक्रम नोंदविला असला तरी ऐनवेळी कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार शिकवित असलेल्या कोणत्याही विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी पाठविण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मंडळाकडे असतील. त्यामुळे ठराविक विषयाच्याच उत्तरपत्रिका तपासणीसाठी पाठवाव्यात याबाबत आग्रह अथवा दावा करता येणार नाही, याबाबत संबंधित शिक्षकांना सुचित करावे.

३. नियुक्ती पत्रावरील शेवटच्या REMARK या कॉलममध्ये जे शिक्षक दीर्घ मुदतीच्या रजेवर, प्रसुती रजेवर, बाल संगोपन रजा, गंभीर आजारामुळे उपचाराकरीता रजेवर, सेवानिवृत्ती पूर्व रजेवर असल्यास तसा शेरा लाल शाईने दर्शवून त्या संबंधित वैद्यकीय दाखला, रजा मंजुरी आदेश व तत्सम कागदपत्रे सदर नियुक्तीपत्रासोबत जोडून विहीत कालावधीमध्ये मंडळास सादर करावे.

४. नियुक्ती पत्र मंडळास सादर केल्यानंतर एखाद्या शिक्षकाची बदली/राजीनामा/सेवानिवृत्ती/निधन झाल्यास त्वरित लेखी स्वरुपात आवश्यक सहपत्रासंह मंडळास कळविण्यात यावे.

५. आपणांकडून सदर पॅनलची माहिती मुदतीत न कळविल्यास अगर पॅनलमध्ये काही दुरुस्ती असल्यास त्या आपणांकडून न केल्यास आपणास या पत्रासोबत पाठविलेले पॅनल स्वीकृत समजून परीक्षक/नियामक यांना सरळ पेपर तपासणीच्या नियुक्त्या दिल्या जातील. याबाबत नियुक्तीनंतरच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. परीक्षेच्या अतिमहत्वाच्या, कालमर्यादीत कामामध्ये त्यामुळे अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**६. असे निदर्शनास आले आहे की आपणास पाठविलेल्या पॅनल फॉर्ममध्ये काही कनिष्ठ महाविदयालयाकडून A- Grantable, B- Partly Grantable, C- CHB व D- Self Finance हे शेरे नमूद केलेले नाहीत. याबाबत आपणास ऑनलाईन व ऑफलाईन झालेल्या सहविचार सभेमध्ये अवगत करण्यात आले होते. तरीसुध्दा आपण याची दखल घेतलेली नाही असे निदर्शनास येते. तरी या पत्रासोबत पाठविण्यात आलेल्या अंतिम नियुक्ती पत्रावर तसेच अन्य काही दुरुस्त्या असल्यास सदर शेरे लालशाईने परिपूर्ण नोंदवूनच नियुक्तीपत्र कार्यालयास सादर करावे. ज्या कनिष्ठ महाविदयालयाकडून सदर सुचनेचे पालन केले जाणार नाही त्यांचेवर मंडळ नियमानुसार उचित कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.**

उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती अथवा REMARK व त्यासंबंधी कागदपत्रे विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यानंतर येणाऱ्या दुरुस्त्या व पत्राचा विचार केला जाणार नाही. तसेच शासनाच्या म.खा.शा. सेवाशर्ती नियम १९८१ मधील सेवकाचे कर्तव्य नियम क्र. २२ (१) अंतर्गत अनुसूची (अ) मधील ४ (१८,१९) नुसार व राज्यमंडळ कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व शिक्षकांनी मंडळाच्या परीक्षेचे काम स्वीकारणे अनिवार्य आहे. ही बाब सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव:-**

**१. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**
**२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा/सांगली/कोल्हापूर**
**३. अधीक्षक, वेतनपथक, सातारा/सांगली/कोल्हापूर**